# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website: www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक
ई-मेलव्दारे

जा.क्र.१०/एनजीपी/उन्हाळी सुट्टी /२०१९/ ३८३
दिनांक : - 8 APR 2019

विषय- उन्हाळी सुट्टी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ बाबत...
संदर्भ- सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे दि. १.४.२०१९ रोजीचे पत्र

सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित व विनाअनुदान तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर पदविका संस्थामधील ( स्वायत्त तंत्रनिकेतना व्यतिरिक्त इतर ) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना प्रती वर्षी २० दिवस हिवाळी सुट्टी व ४० दिवस उन्हाळी सुट्टी देण्यात येते.

त्या अनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, प्रात्यक्षिक व सैध्दांतिक परीक्षा तसेच उत्तरपत्रिका मुल्यमापनाच्या कामासाठी लागणारा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग थोपवून दिनांक १७.५.२०१९ ते २५.६.२०१९ पर्यत ४० दिवस उन्हाळी सुट्टी देण्यात यावी.

तसेच परीक्षा व उत्तरपत्रिका मुल्यमापनाच्या कामासाठी ज्या कर्मचा-यांना थांबविण्यात येईल ते परीक्षेची कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यांना पुढे असे ही कळविण्यात येते की, संबधित कर्मचारी वर्गाकडून परीक्षेच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा काम चुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, हे ही संबधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे.

तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक स्वायतत्ता दिलेली आहे, त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या कालावधीचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या परीक्षेच्या कामासाठी लागणारा कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोईनुसार सुट्टी देण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापी सदर सुट्टी ४० दिवसांपेक्षा जास्त असू नये.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्र. 2947
दिनांक 12 APR 2019

( डॉ. अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण, म. रा., मुंबई

प्रत- प्राचार्य, शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर तत्सम पदविका संस्था ( संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत )

प्रत- माहिती व पुढील आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित:

१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पूणे.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, औरंगाबाद/मुंबई/नागपूर/पुणे.

पृष्ठांकन क्रमांक : तंशिविकाना/आस्था-२ /२०१९/ 1250
दिनांकः- 15 APR 2019

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

१) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर, गोंदिया, साकोली, ब्रम्हपुरी, गडचिरोली व आर्वी.
२) प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर, नागपूर
३) प्राचार्य, हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड कॅटरींग टेक्नॉलाजी, नागपूर
४) प्राचार्य, आचार्य श्रीमन्नारायण तंत्रनिकेतन संस्था, पिपरी, वर्धा.
५) प्राचार्य, श्रीमती कुसुमताई वानखेडे इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, काटोल
६) प्राचार्य, इन्स्टीटयुट डिप्लोमा इन फार्मसी, बोरगांव मेघे, वर्धा.
५) प्राचार्य, इन्स्टीटयुट ऑफ डिप्लोमा ईन मेडीकल लेबॉरटरी टेक्नॉलाजी, नागपूर
६) प्राचार्य, इन्सटीटयुट ऑफ डिप्लोमा इन फार्मसी, नागपूर.
७) प्राचार्य, वुमेन्स टेक्नीकल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, नागपूर.
८) सर्व विनाअनुदानित संस्था

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर